Shiv Chhatrapati Shikshan Sanstha

**Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur. 413512 (M.S.)**

(Autonomous)

(NAAC Reaccredited 'A' grade with CGPA 3.38,
CPE (Phase III) Status by UGC & FIST support by DST )

National Conference

on

# Human Rights and Social Justice

**NCHRSJ-2016**

13th & 14th, March 2016

## PROCEEDINGS

ISBN 978-93-5240-046-1

**Chief Editor**
Dr. S.D. Salunke
Principal

**Editor**
Dr. M.H. Gavhane
Vice-Principal

**Editorial board**

Prof. S. S. Patil
Prof. M. V. Shelke
Prof. D. M. Bansode
Prof. V. D. Waghmare

Organised by

Department of Political Science

Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur. 413512 (M.S.)



123 3118 GHULE HANUMANT


**Shiv Chhatrapati Shikshan Sanstha**
**Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur. 413512 (M.S.)**
**(Autonomous)**
**(NAAC Reaccredited 'A' grade with CGPA 3.38,**
**CPE (Phase III) Status by UGC & FIST support by DST )**


**National Conference**

**on**

# Human Rights and Social Justice

## NCHRSJ-2016

**13th & 14th, March 2016**

# PROCEEDINGS

**ISBN 978-93-5240-046-1**


**Chief Editor**
**Dr. S. D. Salunke**
Principal
Rajarshi Shahu Mahavidyalaya
(Autonomous), Latur

**Editor**
**Dr. M. H. Gavhane**
Vice-Principal
Rajarshi Shahu Mahavidyalaya
(Autonomous), Latur



**Editorial board**
Prof. S. S. Patil
Prof. D. M. Bansode
Prof. V. D. Waghmare
Prof. M. V. Shelke


**Organised by**
Department of Political Science
Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur

**Aruna Prakashan, Latur**

**Human Rights and Social Justice**

**Proceedings**

**Edited By** - Dr. M.H. Gavhane

**ISBN 978-93-5240-046-1**

**Aruna Prakashan,**

103, Omkar Complex - A,

Khardekar Stop, Ausa Road, Latur.

Mo. 9421486935, 9421371757

© **Edited By :** Dr. M.H. Gavhane

**First Editon : 13 March 2016**

**Offset :** Arty Offest, Latur

**Designer :** Viru Gulve

The views expressed in various articles are those of the authors and not of the Editors of the proceeding book.

४१.

# बालकामगार

प्रा.विश्वनाथ महोदव आवड
राज्यशास्त्र विभाग
शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज

**प्रस्तावना :**

बालकामगारांच्या संदर्भातील प्राचीन भारतीय सामाजीकव्यवस्थेचा अढावा घेताना कौटिल्याच्या लिखाणामधे या प्रथेचे समर्थन केलेले आहे असे दिसते. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ग्रेट ब्रिटनमधे मोठ्या मोठ्या यंत्राची घुराडयातील काजळी पुसण्याचे काम बालकांना देण्यात आल्याचा उल्लेख आढळतो. भारतात ही समस्या मोठ्या प्रमाणात दिसते. १९७१ च्या जनगणनेसार आंधप्रदेशात सर्वात अधिकतर केरळ मधे सर्वात कमी बालकामगार आढळले. एकूण आकडेवारी पाहता भारतात ग्रामीण भागामधे बालमजूरीचे प्रमाण आढळते.

शेती, छोटे व्यवसाय, हातगाडे, बाजार, मंडई, हॉटेलमधे कपबशी विसळणे . घरकाम कचरा गोळा करणे . भंगार गोळा करणे . चिंध्या वेचणे या व यासारख्या अनेककामावर आज कमी पगारामधे बालके काम करताना दिसतात.

प्रस्तूत निबंधामधे बालकामगार ह्या विषयाची मांडणी करताना या प्रथेचे समर्थन करण्याचा प्रयत्न केलेला नाही पण ही प्रवृत्ती का निर्माण झाली त्याचे परीणाम व त्यावरील कायदे घटनात्मकतरतुदी व उपाययोजना या अंगाने मांडणी केलेली आहे.

**कारणे :**

१. मुळातच बालमजुरी हा प्रश्न आर्थिक कारणाशी व स्वार्थाशी निगडीत आहे. कारण मोठ्या शहरामधे किंवा ग्रामीण भागमधे स्वस्त श्रमामधे कामगार उपलबध होत नाहीत त्यामुळे उत्पादनाची किंमत जादा मजुरीमुळे जादा होते याउलट बालकांना कामावर ठेवल्यामुळे त्याची किंमत कमी होते परीणामी छोटया व्यवसायमाध्ये बालमजूरी वाढलेले दिसते

२. घरातील हालखीची परीस्थीती. आर्थिकदैन्यावस्था. त्यामुळे दैनंदिन गरजा भागविता न आल्यामुळे कुटुंबातील सर्वच कामवर जातात त्यामुळे प्रमुखांकडूनच बालमजूरी करण्यास बालकांना भाग पाडल जाते

३. आर्थिक दैन्यावस्था आणि उपलब्ध पैशाची कमतरता ही जशी महत्वाची कारणे आहेत तशीच आणखी काही कारणे सांगता येतील त्यामधे प्रामूख्याने मुल्य हरविलेली समाजव्यवस्था सामाजीकजबाबदारीचे भान नसलेले राज्यकर्ते . पालकांचे मुलांवर होणारे दुर्लक्ष किंवा अतिलक्ष कुटुंबातील समस्या . बालगुन्हेगारी ढासळलेली समाजव्यवस्था अविवेकी लोकमत कामचुकार प्रशासन या सारखी अनेककारणे या साठी कारणीभुत असलेली दिसतात.

**परीणाम :**

१. बालमजुरी केवळ बालकांच्या शारीरीकगोष्टीकडे दुर्लक्ष होते असे नाही तर एकंदरीत त्याचा मानसीकविकासही खुंटतो लहान वयामधे काम करण्यामुळे अकाली प्रौढत्व येते अंगी असलेला निरागसपणा अल्लडपणा संपतो ही मुलै एकाकी होतात व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत जाते.

२. बालमजुरीमुळे बालकांमधे लैंगीकविकृतीही मोठ्या प्रमाणात वाढते लैंगिक विकृतीसाठी अनेकठिकाणी मुलांना वापरले जाते त्यामुळे त्यांचे लैंगिकशोषणही मोठ्या प्रमाणात होते.

३. लहान वयातच कामाला लावले गेल्यामुळे त्यांच्या शैक्षणिकसंधी पासून ही मुले वंचीत राहातात बालसुलभ वयातच बालसुलभ खेळ व करमणूकीचे साधने यासारख्या शारीरीक व मानसीकउंची वाढविणाऱ्या साधनापासून व खेळापासून वंचीत राहतात

४. प्रकृतीस अपायकारकअसलेल्या ठिकाणी काम केल्यामुळे शरीरामधे दुर्बलता व स्वभावात अवरोध निर्माण होतो

५. वास्तवीकपाहाता कामगार हा आर्थिकविकासाला हातभार लावणारा महत्वाचा घटकआहे पण बालकामगारामुळे आर्थिकविकासाला हातभार तर लागत नाही उलट लंपन भांडवलशाही निर्माण होते.

**कायदे :**

१. भारतात १८९१ साली भारतीय कारखाना कायदा अधिनियम बालकामगारांविषयी निर्बंध घालण्यासाठी केलेला होता.

२. शाही आयोगाच्या शिफारशीवरुन १९३८ मधे बालक अधिनियमानुसार गोदी व रेल्वेमधे १५ वर्षाखालील बालकास ठेवण्यास बंदी घालण्यात आली.

३. १९३९ च्या बालरोजगार अधिनियमामधे काही धंदयामधे १२ वर्षाखालील लहान मुलांना रोजंदारीवर ठेवण्यास बंदी घालण्यात आली

ISBN 978-93-5240-046-1

४. १९५१ साली आंतरराष्ट्रीय मजदूर संघटनेने बालकांना रात्रपाळीचे काम देण्यास बंदी घातली

५. भारतीय संविधानच्या मार्गदर्शक तत्वामधे सर्व बालकांना शोषणापासून मुक्त ठेवण्यासाठी व २४ अनुच्छेदनुसार कामावर ठेवणेसाठी प्रतिबंध करण्यात आला.

अशी विविध प्रकारे कायदयाच्या तरतुदी बालकामगारांसाठी करण्यात आलेल्या असल्यातरी ही समस्या कमी करण्यासाठी काही उपाययोजना करणे निश्चीत आवश्यक आहे केवळ घटनात्मक किंवा कायदयाच्या तरतुदींच्या अधारे हा प्रश्न निकालात निघाणार नाही.

**उपाययोजना :-**

१. मुळातच बालकामगार म्हटले की फक्त गरीबांची मुले ध्यानात येतात पण हे बालकामगार श्रम करुन आपल्या कुटुंबाची मदत करीत असतात त्यांनी श्रम नाही केले तर कादाचीत त्यांच्या घरची चुलही पेटणार नाही याचा विचार मानवी हक्काचा विचार करताना झाला पाहिजे कारण जोपर्यंत त्याच्या घरची चूल पेटविण्याची व्यवस्था त्याच्या घरातील मोठ्या व्यतींच्या श्रमातील मजुरीमधे होत नाही तोपर्यंत याला विरोध करण्याचा नैतिक अधिकार समाजाला नाही.

२. बालकामगार मोठ्या प्रमाणात अनाथ बेवारस मुले असतात कामे केल्याने त्यांना किमान अन्न तरी मिळते बालकामगारांना मोफत अन्न व शिक्षण यामधे सरकारने लक्ष दिले तर बालमजुरीला काही प्रमाणात आळा बसु शकेल.

३. संपुर्ण देशात एकटोल फ्री नंबर देण्यात यावा की कोणासही बालकामगार आढळल्यास संबधीत क्रमांकावर कळविले जाईल आणी खात्री झाल्यानंतर बालकामगार ठेवलेल्या व्यक्तीवर कारवाई केली जावी, गुन्हा नोंदिविला जावा.

४. धंदे अथवा व्यवसाय करताना निव्वळ नफा मिळविणे हा उददेश असल्याने कमी श्रमामधे मुलांना कामावर ठेवले जाते अशावेळी कामगार कायदे अधिक सोचे करुन दोषी आढळणाराचे व्यवसाय परवाने रद्द केले जावेत.

५. कुटुंबातील कलह व्यसनाधिनता . घरातले मोठ्यांचे प्रेम न मिळने . संस्कारहीन पिढी तयार होते आहे अशा कुटुंबाचे व बालकांचे समुपदेशन केल्यास निश्चीतच यश मिळू शक्ते.

६. प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी किंवा आवश्यक्तेनुसार तालुक्याच्या ठिकाणी स्वतंत्र बालकामगार निरीक्षकाची नियुक्ती झाल्यास आणि संबधीत अधिकारी वर्गाने प्रमाणिकप्रणे काम केल्यास या क्षेत्रामधे अव्हानात्मककाम होवू शक्ते.

७. बालमजुरी हे अर्थव्यवस्थेचे कुरूप व विद्रुप स्वरूप आहे. कुटुंबाच्या दारिद्रयचा भाग मुलांच्या वाटयाला येतो आणि बालके अपरिहार्यतेमुळे कामावर जाण्यास तयार होतात त्यामुळे बालमजुरी ही समस्या केवळ कायदयाने बंद होईल असे नाही तर आई आणि वडिलांच्या श्रमामधे त्यांची आजची आणि उदयाच्या अन्नाची गरज पूर्ण झाली पाहिजे.

८. बालकाना बालसुलभ शिक्षण देण्याबरोबरच त्यांचावर होणारे संस्कारही महत्वाचे आहेत त्यासाठी शासन बरोबरच समजाच्या प्रयत्नांची आवश्यक्ता आहे.

आज बालकामगार म्हणजे हरविलेली पाखरे आहेत असे म्हटले तरी वावगे ठरू नये बालमजुरी या महत्वाच्या प्रश्नाकडे एक जागृक नागरीक या नात्याने जो पर्यंत आपण पाहात नाही तो पर्यंत त्यांचे ओझे वाहण्याचे काम कमी होणार नाही या समस्येकडे बघत बसुन चालणार नाही तर कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होण्याबरोबरच सामाजीक्तेचे भान सर्वांनी जपण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ**


१. वैकासीकमानसशास्त्र

२. सकाळ अग्रलेख

३. बालमजूरी कायदा १९८६

४. लोकमत कालदर्शिका

५. भारतीय राज्यघटना


◆◆◆